मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# मोदींच्या विरोधात हजारो उमेदवार उभे करणार

## मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत निर्णय

**। पिंपरी-चिंचवड।**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी येत्या चार दिवसात ‘सगे सोयरे’ बाबतच्या अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करावे, अन्यथा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात कमीत कमी एक हजार उमेदवार उभे करून मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात आजवर गप्प बसलेल्या पंतप्रधानांचे लक्ष वेधणार असल्याचे मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत सर्वानुमते जाहीर करण्यात आले. मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाज पुणे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची आज रविवार (दि.१०) बैठक भोईर व्यायाम शाळा चिंचवडगाव येथे शेकडो कार्यकर्त्यांच्या



उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीसाठी मारुती भापकर, मनोहर वाडेकर, प्रकाश जाधव, सतीश काळे, जीवन बोराडे, धनाजी येळकर, नकुल भोईर, वैभव जाधव, वसंत पाटील, संजय जाधव, अभिषेक म्हसे, सचिन पवार, शिवाजी पाडुळे, गणेश देवराम, ब्रह्मानंद जाधव, अमोल ढोरे, भाऊसाहेब ढोरे, सतीश शेलार, संदीप नवसुपे, ओंकार देशमुख, मोहन पवार, राज साळुंखे, स्वप्नील परांडे यांच्या सह अनेकजण उपस्थित होते.

मनोज जरांगे पाटील यांना नवी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र सरकारच्या वतीने ‘सगे सोयरे’ बाबतची अधिसूचना काढून आंदोलन स्थगित करावयास लावले. सदरच्या अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करण्याचे वचन लाखो मराठा आंदोलकांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. १६ फेब्रुवारी पर्यंत यावर हरकती मागवण्यात आल्या, त्याची मुदत संपून तीन आठवडे झाले. तरी महाराष्ट्र सरकारने सदर सगेसोयरे बाबतच्या अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर केले नाही. सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्यासह मराठा समाजाची प्रचंड फसवणूक केली. याच्या निषेधार्थ पिंपरी चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील मराठा क्रांती मोर्चा लोकसभेच्या मावळ, शिरूर, बारामती व पुणे मतदार संघात हजारो उमेदवार उभे करणार असल्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी येत्या चार दिवसात सदर अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करावे अन्यथा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात कमीत कमी एक हजार उमेदवार उभे करून मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात आजवर गप्प बसलेल्या पंतप्रधानांचे लक्ष वेधणार असल्याचे या बैठकीत सर्वानुमते जाहीर करण्यात आले. तसेच आचारसंहिता लागू होण्यापूर्वी पिंपरी चिंचवड शहरात व पुणे जिल्ह्यात येणाऱ्या मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या सह सर्व मंत्र्यांना घेराव घालून जाब विचारणार असल्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

# जागतिक महिला दिनानिमित्त पिंपळेगुरव मध्ये ‘मशाल मार्च’

## तुळजाभवानी मंदिर ते राजमाता जिजाऊ उद्यान पर्यंत मशाल मार्च

**। पिंपरी-चिंचवड।**

जागतिक महिला दिनानिमित्त पिंपळे गुरव येथे तुळजाभवानी मंदिर ते राजमाता जिजाऊ उद्यान पर्यंत मशाल मार्च रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्त्री म्हणजे राख नही, धगधगता अंगार है.. स्त्रीचा आभिमान आणि स्वाभिमान कर्तृत्वाची जाणीव व्हावी म्हणून मशाल मार्चचे आयोजन केले होते.यावेळी मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीचे शहराध्यक्ष आण्णा जोगदंड म्हणाले कि, महिला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव




करून देण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आत्मविश्वासने व धाडसाने कार्यरत आहेत. तसं पाहिलं तर खुरपणीपासून ते नासापर्यंत आणि राष्ट्रपती पदापर्यंत महिला कार्यरत आहेत. कोणत्याही क्षेत्रात महिला मागे राहीलेल्या नाहीत. रामेश्वर महाजन बेसिक टिमचे सिटी इनचार्ज म्हणाले कि, जीच्या उदरातून जन्म घेते दुनिया सारी, त्या विश्व शक्तीचे नाव आहे नारी.. हे नारी तु घे भरारी, बघेन कौतुकाने दुनिया सारी..असे म्हटले आहे. यावेळी राजमाता जिजाऊ उद्यानच्या समोरच पटनाट्यातून जनजागृती केली.याप्रसंगी कु. अर्वी कांबळे या मुलीने मर्दानी खेळ खेळून उपस्थितीतांचे मन जिंकली. यावेळी सडक सुरक्षा सप्ताह निमित्त सर्वांना आण्णा जोगदंड यांनी सुरक्षितेची शपथ तर पर्यावरणाची जयश्री आरणे यांनी शपथ देऊन मशाल रॅलीची सांगता करण्यात आली. यावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक, वाय. बी. फल्ले, मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीचे शहराध्यक्ष आण्णा जोगदंड, मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीच्या पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगिता जोगदंड, मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष व वृक्षमित्र अरूण पवार, माजी नगरसेवक महेश जगताप, राजू लोखंडे, सागर अंघोळकर, चंदाताई लोखंडे, उषाताई मुंढे, सुरेश सकट, राजू ओव्हाळ, मुकादम, सिद्धार्थ जगताप अशोक सोनटक्के बेसिक सिटी इनचार्ज, रामेश्वर महाजन, वॉर्ड इनचार्ज स्वराज कांबळे, निकेश सरवदे, समाधान कांबळे, मारुती कांबळे, दीपक चौर, राहुल जाधव, राहुल चव्हाण, ऋतुजा पेडणेकर, डॉ भूषण पेडणेकर, पल्लवी भाटे अनेक महिला व नागरिक सहभागी झाले होते.

# दुचाकी चोरणाऱ्या सराईताच्या मुसक्या आवळल्या

## भोसरी पोलिसांची मोठी कामगिरी; १६ दुचाकी जप्त




**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** भोसरी पोलिसांची मोठी कामगिरी समोर आली आहे. दुचाकी चोरणाऱ्या सराईताला सापळा रचून पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. त्याच्याकडून चोरीच्या १६ दुचाकी जप्त केल्या आहेत. योगेश शिवाजी दाभाडे (२४, रा. वळसाने, धुळे.) असे अटक आरोपीचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोसरी परिसरात दुचाकी चोरीचा शोध घेत असताना सीसीटीव्ही फुटेजमध्ये सराईत निष्पन्न झाला. त्यानुसार, पोलिसांनी तपास पथके तयार करून आरोपीला भोसरी परिसरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता त्याने व त्याचा साथीदार मॉन्टी वाघ (२२, वर्षे रा. दहिवद, ता. चाळीसगाव, जि. जळगाव) या दोघांनी भोसरी, चाकण, म्हाळुंगे, खडकी, तळेगाव दाभाडे, लोणीकंद, सांगवी या परिसरातून १६ दुचाकी चोरल्याचे कबूल केले. पोलिसांनी दुचाकी जप्त केल्या आहेत.

आरोपी योगेश शिवाजी दाभाडे हा अट्टल मोटारसायकल चोरटा असून त्यांच्यावर पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय, नाशिक शहर आयुक्तालय, नाशिक ग्रामीण, जळगाव ग्रामीण, धुळे ग्रामीण येथे दुचाकी चोरीचे एकूण १७ गुन्हे केले आहेत. आरोपीकडून गुन्ह्यातील चोरी केलेल्या एकूण ३ लाख ८४ हजार रुपयांच्या १६ मोटारसायकल हस्तगत करणेत भोसरी तपास पथकाला यश आलेले आहे.

ही कामगिरी भोसरी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वनाथ चव्हाण, निरीक्षक रूपाली बोबडे, उपनिरीक्षक बालाजी जोनापल्ले, मुकेश मोरे, कर्मचारी हेमंत खरात, नवनाथ पोटे, प्रकाश भोजने, नाइक मुळे, स्वामी नरवडे, सागर जाधव, आशिष गोपी, प्रभाकर खाडे, सचिन सातपुते, महादेव गारोळे, ज्ञानेश्वर साळवे यांच्या पथकाने केली आहे.

# केंब्रिज चॅम्प्स इंटरनॅशनल प्री स्कूलच्या कृष्णानगर शाखेत महिला दिन उत्साहात




**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** धकाधकीच्या जीवनामध्ये महिलांना एक हक्काचे व्यासपीठ सौ. कीर्ती मारुती जाधव यांनी निर्माण करून दिले आहे. यात सर्व महिला अतिशय आनंदाने सहभागी होतात. यामध्ये कृष्णानगर, फुलेनगर, शरदनगर, कोयनानगर, घरकुल परिसरातील महिलांनी सहभाग घेतला. यामध्ये गप्पागोष्टी डान्स वेगवेगळ्या प्रकारचे खेळ, झिम्मा, फुगडी हे सर्व घेण्यात आले.महिला दिन साजरा करण्यासाठी सर्व टीचर्स स्टाफ यांनी खूप परिश्रम घेतले. सर्व महिला आल्याबद्दल केंब्रिज चाम्प्स इंटरनॅशनल प्री स्कूल कृष्णानगर ब्रांच चे डायरेक्टर सौ. कीर्ती मारुती जाधव यांनी आभार व्यक्त केले.

# दोन ‘दादां’नीच नगरसेवक निवडून आणले

## सुप्रिया सुळेंसमोर अजित पवारांचं खोचक विधान!



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यापासून दोन्ही गटांनी एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडलेली नाही. आता आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कुणाला निवडून येण्यासाठी कुणी मदत केली आणि कुणासाठी कुणी प्रचारसभा घेतल्या या मुद्द्यांवरून दोन्ही गटांमध्ये दावे-प्रतिदावे होताना पाहायला मिळत आहेत. यासंदर्भात आज अजित पवार यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात बोलताना केलेलं सूचक विधान चर्चेचा विषय ठरलं आहे. विशेष म्हणजे व्यासपीठावर खासदार सुप्रिया सुळे उपस्थित असताना त्यांनी हे विधान केल्यामुळे राजकीय तर्त-वितर्कांना उधाण आलं आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये सुंदोपसुंदी चालू असताना पुण्यात नगरसेवकांना कुणी निवडून आणलं, हा मुद्दा अजित पवारांनी उपस्थित केला. इथे मीच अनेक नगरसेवकांना निवडून आणलंय. काहींना चंद्रकांत पाटलांनी निवडून आणलंय. म्हणजे दोन्ही दादांनीच लोकं निवडून आणली आहेत. बाकी कुणी आलेलं नव्हतं. एकतर भाजपाचे तरी दादा किंवा राष्ट्रवादीचे तरी दादा, असं अजित पवार म्हणाले.इथल्या आरोग्य व्यवस्थेबाबत इतरांनीही प्रयत्न केला. पण त्या काळात कुणालाच हे रेटलं नाही. दोन वर्षांत आम्ही ठरवलं. मी देवेंद्र फडणवीसांना म्हणालो की आपल्याला मर्यादित वेळेत हे करायचंय. त्यातून मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचा पर्याय पुढे आला, असंही अजित पवारांनी नमूद केलं. तसेच, भाषणाच्या शेवटी तिसऱ्यांदा नरेंद्र मोदींना निवडून आणायचंय, असंही ते म्हणाले. दरम्यान, अजित पवारांनी भाषणात मांडलेल्या मुद्द्यावर सुप्रिया सुळेंनी नंतर माध्यमांशी बोलताना उत्तर दिलं. पुण्यात पक्षाची जबाबदारी त्यांच्याकडेच होती. हीच शरद पवारांची खासियत आहे. शरद पवारांनी खूप तरुण टीम उभी केली. सत्तेचं विकेंद्रीकरण केलं. शरद पवारांनी त्या त्या जिल्ह्याची जबाबदारी असणाऱ्या व्यक्तीला पूर्ण निर्णय स्वातंत्र्य दिलं होतं. प्रचाराला आम्ही सगळेच आलो होतो. पण निर्णय प्रक्रियेत कधीही ढवळाढवळ केली नाही हे आज सिद्ध झालं. मी अजित पवारांचे आभार मानते की त्यांनी यावर स्पष्टीकरण दिलं की त्यांना निर्णयांचं किती स्वातंत्र्य होतं आणि त्यानुसार ते निवडणुका लढले, अशी खोचक प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.पुण्यात मल्टिस्पेशालिटी हीलिंग हॉस्पिटलच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील आदी नेतेमंडळी उपस्थित होती. यावेळी व्यासपीठावर सुप्रिया सुळे व अजित पवारांच्या मधल्या खुर्चीवर देवेंद्र फडणवीस बसले होते.

### एकाच व्यासपीठावर, संवाद नाही

» संपूर्ण कार्यक्रमात अजित पवार व सुप्रिया सुळे यांच्यात कोणताही संवाद झाल्याचं पाहायला मिळालं नाही. यासंदर्भात बोलताना सुप्रिया सुळेंनी नंतर ते गडबडीत होते, त्यांना पुढच्या कार्यक्रमाला जायचं होतं त्यामुळे बोलायची संधीच मिळाली नाही, असं विधानही केलं. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यापासून दोन्ही गटांनी एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडलेली नाही. आता आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कुणाला निवडून येण्यासाठी कुणी मदत केली आणि कुणासाठी कुणी प्रचारसभा घेतल्या या मुद्द्यांवरून दोन्ही गटांमध्ये दावे-प्रतिदावे होताना पाहायला मिळत आहेत. आपल्या भाषणात सुप्रिया सुळेंनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर घ्याव्यात, अशी मागणी राज्य सरकारकडे केली.

# वारजे : ३७५ खाटांच्या मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाचे भूमीपूजन

## उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** समाविष्ट ३४ गावांतील मिळतकर शास्तीकराचा प्रश्न पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर सोडविला जाईल. तोपर्यंत शास्तीकराची आकारणी करण्यात येऊ नये, अशी सूचना महापालिकेला करण्यात आली आहे.

यासंदर्भातील शासन निर्णय लवकरच घेतला जाईल, असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. तर, वारजे येथील पोलीस ठाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठीची आरक्षित जागा तातडीने देण्याची सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांना केली. वारजे येथील ३७५ खाटांच्या मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाचे भूमीपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी ही ग्वाही दिली. खासदार सुप्रिया सुळे, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार भीमराव तापकीर, आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्यासह भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसचे




माजी नगरसेवक उपस्थित होते.आमदार भीमराव तापकीर यांनी समाविष्ट गावातील मिळकतकर आणि पोलीस ठाण्याच्या जागेच्या प्रश्नासंदर्भात पवार आणि फडणवीस यांचे लक्ष वेधले. त्यावेळी त्यांनी ही ग्वाही दिली. अजित पवार म्हणाले की, शहरातील आरोग्याच्या गंभीर प्रश्नासंदर्भात वैद्यकीय सुसज्जता हवी, हे करोना संकट काळात अधोरेखित झाले. त्यातूनच वारज्यात सुसज्ज रुग्णालय उभारणीचा निर्णय पुढे आला. या रुग्णालयातील ३७५ खाटांपैकी १० टक्के खाटा गरजूंना विनामूल्य दिल्या जाणार आहेत. तर सहा टक्के खाटां शासकीय दराने उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. बाणेर येथेही ७५० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय उभारणीचे कामही सुरू आहे. ३४ गावांतील मिळकतकरासंदर्भात काही दिवसांपूर्वी बैठक झाली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर समाविष्ट गावासंदर्भात निर्णय घेतला जाईल. त्यामुळे लोकांना त्रास देऊ नका, मिळकतकराची थकबाकी वसूल करू नका, अशी सूचना महापालिका आयुक्तांना करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या काळात कोणी काही सांगितले, तर त्याच्यावर विश्वास ठेवू नका. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासमवेत याबाबत लवकरच बैठक घेण्यात येईल. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली तर ती संपल्यानंतर त्याबाबतचा शासकीय निर्णय तातडीने घेतला जाईल, असे पवार यांनी स्पष्ट केले.या रुग्णालयाच्या माध्यमातून सुसज्ज वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार आहे.

# यंदा दुग्धजन्य पदार्थांची दर स्थिर राहणार?

## सध्या गायीच्या दुधाला शेतकऱ्यांना २५ ते २७ रुपये दर

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

यंदाच्या उन्हाळ्यात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता कमी आहे. दरवर्षी उन्हाळ्यात दूध उत्पादनात मोठी तूट येऊन दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या किंमतीत वाढ होते. मात्र, यंदा दूध उत्पादनात फारशी तूट येण्याची शक्यता नाही. त्यामुळे दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या किंमती स्थिर राहण्याचा अंदाज आहे. डेअरी उद्योगाचे अभ्यासक आणि कुतवळ फूड्स प्रा. लि.चे प्रकाश कुतवळ म्हणाले, उन्हाळ्यात दुधाला चांगला दर मिळतो. त्यामुळे शेतकरी सजग झाले आहेत. ओला, सुका चारा, पाणी, पशूखाद्यांचे शेतकरी योग्य नियोजन करू लागले आहेत. तापमान, आर्द्रता नियंत्रणात ठेवता येतील, असे अद्ययावत गोठे उभारले गेले आहेत. त्यामुळे पावसाळ्यातील दूध उत्पादन आणि उन्हाळ्यातील दूध उत्पादनात यापूर्वी दिसून येणारी तूट कमी झाली



आहे.राज्यात सध्या दररोज सरासरी १ कोटी १० लाख लीटर दूध संकलन होते. त्यात म्हशीच्या दुधाचा वाटा ३० टक्क्यांपर्यंत आहे. १५ फेब्रुवारी ते १५ जून हा काळ दुग्ध व्यवसायातील तेजीचा काळ असतो. उन्हाळ्यामुळे दही, ताक, लस्सी, श्रीखंड, आम्रखंड आणि सुंगधी दुधाला मागणी वाढते. त्यामुळे दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या दरात दरवर्षी वाढ होत होती. पण, मागील काही वर्षांपासून पावसाळ्यातील आणि उन्हाळ्यातील दूध उत्पादनात फारसा चढ-उतार होताना दिसत नाही. फार तर पाच ते दहा टक्के चढ-उतार जाणवतो, असेही कुतवळ म्हणाले.मागील काही वर्षांपासून गायीच्या दूध दरात मोठा चढ-उतार दिसून येत आहे. सध्या गायीच्या दुधाला शेतकऱ्यांना २५ ते २७ रुपये दर मिळत आहे.

त्या तुलनेत म्हशीच्या ६.० स्निग्धांश असलेल्या दुधाला ५० रुपये प्रति लीटर दर मिळत आहे. संकरीत गायी सातत्याने आजारी पडतात. त्याचा चारा-पाणी आणि औषधांचे काटेकोर व्यवस्थापन करावे लागते. त्या तुलनेत म्हशींचा दूध उत्पादन खर्च कमी आहे. आजवर प्रामुख्याने कोल्हापूर, सांगली परिसरात म्हशीचे दूध उत्पादन जास्त होत होते. आता नगरसारख्या गायीच्या दूध उत्पादनात आघाडीवर असलेल्या जिल्ह्यातही म्हशीच्या दूध उत्पादनात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.उन्हाळ्यात दूध, दुग्धजन्य पदार्थांच्या मागणीत वाढ होत असली तरीही दरवाढ होण्याची शक्यता नाही. जागतिक बाजारात दूध पावडर आणि चीझचे दर पडलेले आहेत. त्यामुळे प्रक्रियेसाठी दुधाची उपलब्धता चांगली आहे. यंदाच्या उन्हाळ्यात दूध खरेदीसह दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे दर स्थिर राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती कात्रज दूधचे अध्यक्ष भगवान पासलकर यांनी दिली.डेअरी उद्योगाचे अभ्यासक आणि कुतवळ फूड्स प्रा. लि.चे प्रकाश कुतवळ म्हणाले, उन्हाळ्यात दुधाला चांगला दर मिळतो. त्यामुळे शेतकरी सजग झाले आहेत. ओला, सुका चारा, पाणी, पशूखाद्यांचे शेतकरी योग्य नियोजन करू लागले आहेत. तापमान, आर्द्रता नियंत्रणात ठेवता येतील, असे अद्ययावत गोठे उभारले गेले आहेत.

त्यामुळे पावसाळ्यातील दूध उत्पादन आणि उन्हाळ्यातील दूध उत्पादनात यापूर्वी दिसून येणारी तूट कमी झाली आहे.राज्यात सध्या दररोज सरासरी १ कोटी १० लाख लीटर दूध संकलन होते. त्यात म्हशीच्या दुधाचा वाटा ३० टक्क्यांपर्यंत आहे.

### म्हशीच्या दूध उत्पादनात वाढ


**» राज्यात सध्या दररोज सरासरी १ कोटी १० लाख लीटर दूध संकलन होते. त्यात म्हशीच्या दुधाचा वाटा ३० टक्क्यांपर्यंत आहे. १५ फेब्रुवारी ते १५ जून हा काळ दुग्ध व्यवसायातील तेजीचा काळ असतो. उन्हाळ्यामुळे दही, ताक, लस्सी, श्रीखंड, आम्रखंड आणि सुंगधी दुधाला मागणी वाढते. त्यामुळे दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या दरात दरवर्षी वाढ होत होती. पण, मागील काही वर्षांपासून पावसाळ्यातील आणि उन्हाळ्यातील दूध उत्पादनात फारसा चढ-उतार होताना दिसत नाही. फार तर पाच ते दहा टक्के चढ-उतार जाणवतो, असेही कुतवळ म्हणाले.मागील काही वर्षांपासून गायीच्या दूध दरात मोठा चढ-उतार दिसून येत आहे. सध्या गायीच्या दुधाला शेतकऱ्यांना २५ ते २७ रुपये दर मिळत आहे. त्या तुलनेत म्हशीच्या ६.० स्निग्धांश असलेल्या दुधाला ५० रुपये प्रति लीटर दर मिळत आहे.**

# केंद्रीय निवडणूक आयुक्तांनी राजीनामा का दिला

## लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागू शकते

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी एक देश, एक निवडणुकीचा नारा देत आहेत. प्रत्यक्षात एक निवडणूक आयुक्त, एक निवडणूक, अशी स्थिती निर्माण झाली आहे. केंद्रीय निवडणूक आयुक्तांनी राजीनामा का दिला, हे देशासमोर आले पाहिजे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी रविवारी केली. पाटील म्हणाले, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागू शकते. अशा काळात केंद्रीय निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी राजीनामा दिला आहे. २०२७ पर्यंत कार्यकाळ असणाऱ्या अधिकाऱ्याने ऐन निवडणुकीच्या तोंडावर राजीनामा का दिला? त्यांच्या राजीनाम्यामागचे खरे कारण देशासमोर आले



पाहिजे. केंद्रीय निवडणूक आयोगात एक मुख्य आयुक्त आणि अन्य दोन आयुक्त असतात. यापूर्वीच आयोगातील एक आयुक्तपद रिक्त होते, आता गोयल यांनी राजीनामा दिल्यानंतर आयोगाला एकच मुख्य निवडणूक राहिले आहेत. केंद्र सरकार एक देश, एक निवडणुकीचा नारा देत होते, प्रत्यक्षात एक आयुक्त, एक निवडणूक, अशी स्थिती निर्माण झाली आहे, अशी टीका जयंत पाटील यांनी केली.महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष आणि ठाकरे गट या तीन पक्षांत जागावाटपाची चर्चा झाली आहे. वंचित बहुजन आघाडीचे समन्वयक प्रकाश आंबेडकर यांच्याशी जागा वाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आहे. लोकसभा निवडणुकीसाठीची महाविकास आघाडीच्या उमेदवारांची पहिली यादी दोन दिवसांत जाहीर होईल, असेही जयंत पाटील यांनी सांगितले.मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या (व्हीएसआय) नियामक मंडळाच्या रविवारी झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा दांडी मारली. संस्थेचे अध्यक्ष, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.